स्थापना : २०१८ आर.के.पी.६१६

।। धैर्यम् सर्वत्र साधनम् ।।





शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित

श्री शिवलिंगेश्वर शिक्षण संस्था, संख संचलित

# श्री आर.के.पाटील

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, संख.

फोन : ०२३४४-२९९१२७, मो.नं. ७४४८०००६१६ ता.जत जि.सांगली.

Email-rkpcollegesankh@gmail.com

Webside-www.rkpcollege.ac.in

## माहिती पुस्तिका

२०२३-२०२४

कला, वाणिज्य, विज्ञान,

बी.सी.ए.आणि पदव्युत्तर



# प्रास्ताविक

"धैर्यम् सर्वत्र साधनम्" हे आमच्या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. या ब्रीदवाक्यातली ध्येयाचे स्मरण ठेवून १९६७ पासून विद्यार्थी-विद्यार्थीनींना शिक्षण देवून व उत्तम नागरिकास आवश्यक असणारे सर्व ते संस्कार विद्यार्थ्यांच्यावर करण्यास ही आपली संस्था प्रतिज्ञाबध्द असून त्याप्रमाणे परिसरातील सूजाण व शिक्षणप्रेमी नागरिकांच्या सहकार्याने व प्रेरणेने संस्थेचे कार्य अविरत उत्तमप्रकारे चालू आहे.

ही संस्था ग्रामीण भागातील शेकडो वर्षे शिक्षणापासून वंचित असलेल्या मुला-मुलींना शिक्षण देण्याचे पवित्र कार्य करीत आहे. मुलांच्या बरोबर मुली देखील तेवढ्याच उत्साहाने या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्यावर सुसंस्कार करणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सामाजिक न्यायाची व समतेची जाणीव निर्माण करणे, बंधुता, राष्ट्रीय ऐक्य व राष्ट्रप्रेम जागृत करणे, आधुनिक काळातील जबाबदार नागरिक तयार करणे, विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण करणे, हे संस्थेचे ध्येय आहे.

सुसंस्कृत व शिस्तबध्द नागरिक घडविण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या या संस्थेने एका पाठोपाठ एक अशी यशोशिखरे पादाक्रांत करण्याचा यशस्वी प्रयत्न चालविला आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होण्याच्या दृष्टिकोनातून इयत्ता पहिली ते पदवीपर्यंतेचे शिक्षण सुरु केलेल आहे. त्याचबरोबर संख परिसरातील विद्यार्थ्यांची विशेषत: मुलींचे उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासन दरवारी प्रयत्न केले व शासनाचे पत्र क्रमांक एन.जी.सी.२०/८(१००/१८)मशि-४ दि.१५ जून २०१८ या पत्रान्वये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय संख येथे सुरु करण्यास परवानगी दिली व त्यास शिवाजी विद्यापीठाचे पत्र क्रमांक संलग्नता /टी-२/वि.प.ठराव क्र.२०७/७२७७ दिनांक १९ जुलै २०१८ ने संलग्नता दिली आहे.

डॉ.आर.के.पाटील सर

अध्यक्ष,श्री शिवलिंगेश्वर शिक्षण संस्था,संख.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित

श्री शिवलिंगेश्वर शिक्षण संस्था संख संचलित

# श्री आर.के.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, संख.

ता.जत जि.सांगली -४१६ ४१२. (महाराष्ट्र)

**अंतर्गत कार्ये :**

विविध क्षेत्रातील ज्ञान शाखेमधील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रदान करुन त्या माध्यमातून समाजाची उन्नती साध्यकरण्याकरिता ज्ञानरुपी प्रवासाकडे वाटचाल करणे. चारित्र्य संवर्धन, मनोबल, शरीर संपदा आणि बौध्दिक विकास साधण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी खेडोपाड्यात, अतिदुर्गम भागातील प्रत्येक झोपडीपर्यंत शिक्षणाचा प्रसार करणे.

**ध्येय :**

१) संख व संख परिसरातील उच्च शिक्षणाच्या माध्यमातून गुणात्मक व मुल्यात्मक सेवा उपलब्ध करुन देणे.

२) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे संगोपन करणे.

३) मानवी हक्क आणि जबाबदारी याविषयी विद्यार्थ्यांना जाणिव निर्माण करुन देणे.

४) संस्थेतील मुलभूत सुविधा आणि विविध कृती कार्यक्रमांतून समाज व समाजातील घटकांना परिपूर्णतेकडे घेवून जाणे.

५) स्पर्धात्मक जगातील निर्माण होणाऱ्या नवनव्या आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध समाजिक व आर्थिक स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

---

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये :

* संख परिसरातील एकमेव वरिष्ठ महाविद्यालय.
* तज्ज्ञ व अनुभवी व अभ्यासू प्राध्यापक वृंद.
* प्रशस्त ग्रंथालय व सुसज्ज प्रयोगशाळा.
* विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय.
* सर्व सोयींनीयुक्त भव्य क्रीडांगण.
* अद्ययावत संगणक कक्ष.
* निसर्गरम्य वातावरण.
* सुसज्ज महाविद्यालय इमारत.
* विद्यार्थ्याकरीता वसतीगृहाची सोय.
* विद्यार्थिनीकरीता स्वतंत्र वस्तीगृहाची सोय.